ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## **कार्यवृत्त**

**बैठक क्रमांक** : 192

**स्थळ** : व्यवस्थापन मंडळ सभागृह

**वार व दिनांक** : बुधवार दि. 28 फेब्रुवारी 2024

**वेळ** : सकाळी 11.00 वाजता

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## (महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.192 (Online व ऑफलाईन ), बुधवार दि. 28 फेब्रुवारी 2024 सकाळी 11.00 वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू — अध्यक्ष
2. मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, प्र. कुलगुरू — सदस्य
3. मा. डॉ. सत्यकाम, प्र कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली - Online — सदस्य
4. मा. डॉ. दिगंबर शिर्के, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - Online — सदस्य
5. मा.डॉ. अनिल कुलकर्णी, पुणे — सदस्य
6. मा. डॉ. जयदिप निकम, नाशिक — सदस्य
7. मा. डॉ. संजय घनश्याम भावे, दापोली - Online — सदस्य
8. मा. प्रो. वाल्मिकी सरवदे - Online — सदस्य
9. श्री. नरेंद्र अनंतराव जोशी — सदस्य
10. मा. सचिव, कृषी, मुंबई - Online — सदस्य
    (उपसचिव - श्रीमती ज्योत्स्ना अर्जुन या प्रतिनीधी)
11. मा.श्री. भटूप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक (कायम निमंत्रित) — सदस्य
12. डॉ. गोविंद कतलाकुटे — निमंत्रित सदस्य
13. श्री. दिलीप भरड, कुलसचिव — सचिव

खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

1. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
3. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
4. मा. संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई — सदस्य
5. मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण — सदस्य
6. मा. संचालक, तंत्रशिक्षण,मंबई — सदस्य
7. मा. श्री. उदित शेठ, मुंबई — सदस्य
8. डॉ. संजय चोरडिया, पुणे — सदस्य

| अनु. क्रमांक Subject No. | | तपशील Details |
|---|---|---|
| 192.1 | | **स्वागत**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** सभेच्या सुरुवातीला मा. कुलगुरू यांनी व्यवस्थापन मंडळाचे नवनियुक्त उपस्थित सदस्य डॉ. नरेंद्र अनंतराव जोशी व नवनियुक्त कुलसचिव श्री. दिलीप भरड यांची व्यवस्थापन मंडळाची प्रथम बैठक असल्याने पुष्पगुच्छ, शाल देऊन सत्कार केला व नवनियुक्त सदस्य डॉ. संजय घनश्याम भावे व प्रो. वाल्मिकी कचरू सरवदे हे ऑनलाईन पद्धतीने या बैठकीसाठी उपस्थित होते, यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. तदनंतर ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत होऊन बैठकीस सुरुवात करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 192.2 | 192.2.1 | दिनांक 3 नोव्हेंबर 2023 रोजी झालेल्या 189 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 3 नोव्हेंबर 2023 रोजी झालेल्या 189 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| | 192.2.2 | **दिनांक 3 नोव्हेंबर 2023 रोजी झालेल्या 189 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 3 नोव्हेंबर 2023 रोजी झालेल्या 189 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| | 192.2.3 | **दिनांक 19 डिसेंबर 2023 रोजी झालेल्या 190 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 19 डिसेंबर 2023 रोजी झालेल्या 190 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| | 192.2.4 | **दिनांक 19 डिसेंबर 2023 रोजी झालेल्या 190 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 19 डिसेंबर 2023 रोजी झालेल्या 190 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवालाची नोंद घेतली. |
| | 192.2.5 | **दिनांक 15 जानेवारी 2024 रोजी झालेल्या – ऑनलाईन 191 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 15 जानेवारी 2024 रोजी झालेल्या – ऑनलाईन 191 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| | 192.2.6 | **दिनांक 15 जानेवारी 2024 रोजी झालेल्या 191 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 15 जानेवारी 2024 रोजी झालेल्या 191 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीच्या अहवालची नोंद घेण्यात आली. |
| 192.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 192.3.1<br>परीक्षा विभाग | **परीक्षेचे** Question Paper Multi Copy Charges/Photocopy **चा दर रू. 0.60 (एक बाजू) ऐवजी रु. 1.00 (एक बाजू) प्रती कॉपी करण्यास व त्याची अंमलबजावणी माहे जानेवारी 2024 मधील हिवाळी परीक्षा व त्यापुढील सर्व परीक्षांसाठी लागू करण्यास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** – विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या परीक्षेच्या कागदपत्रांच्या विभागीय केंद्रावर व परीक्षा केंद्रावर Question Paper Multi Copy Charges/Photocopy मोठ्या प्रमाणात काढण्यात येतात. या फोटोकॉपीचा प्रचलित दर पूर्वी 0.60 (एक बाजू) असा होता. सदर दर अत्यल्प असल्याने, त्यात सुधारणा करणेसाठी विभागीय केंद्रांनी बैठकीत वेळोवेळी मागणी केली होती.<br>या अनुषंगाने दि. 1 जानेवारी 2024 रोजी मा. कुलगुरू यांचे उपस्थितीत, सर्व विभागीय केंद्रे यांचेसमवेत झालेल्या बैठकीत विभागीय केंद्रांनी मागणी केल्यानुसार Question Paper Multi Copy Charges/Photocopy चा दर रू. 0.60 (एक बाजू) ऐवजी रु. 1.00 (एक बाजू) प्रती कॉपी करण्यास व त्याची अंमलबजावणी माहे जानेवारी 2024 मधील हिवाळी परीक्षा व त्यापुढील सर्व परीक्षांसाठी लागू करण्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. सदरचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळ यांचेपुढे सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - परीक्षेचे Question Paper Multi Copy Charges/Photocopy चा दर रू. 0.60 (एक बाजू) ऐवजी रु. 1.00 (एक बाजू) प्रती कॉपी करण्यास व त्याची अंमलबजावणी माहे जानेवारी 2024 मधील हिवाळी परीक्षा व त्यापुढील सर्व परीक्षांसाठी लागू करण्यास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 192.3.2<br>परीक्षा विभाग | **जानेवारी आणि मार्च 2024 (कृषी) / सत्र परीक्षा आयोजनासाठी एकूण अंदाजित खर्च रू. 5,74,35,000/- चा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** — विद्यापीठ परीक्षा मंडळ निर्णय 47.3.3 दि. 23.9.2023 नुसार विद्यापीठाच्या जानेवारी आणि मार्च 2024 मध्ये आयोजित करावयाच्या पुरवणी/सत्र/कृषी ऑफलाईन पद्धतीने घेण्याचे ठरले आहे. या दोन वेगवेगळ्या परीक्षा मिळून साधारण 1.75 लक्ष नियमित व पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षेला बसतील असा अंदाज आहे. त्यानुसार अंदाजे 6.00 लक्ष पेपर येतील. या परीक्षा आयोजनाकरिता रू. 5,74,35,000/- इतक्या अंदाजित खर्चास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. सदरचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळ यांचेपुढे सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — जानेवारी आणि मार्च 2024 (कृषी) / सत्र परीक्षा आयोजनासाठी एकूण अंदाजित खर्च रू. 5,74,35,000/- च्या प्रस्तावास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आले. |
| | 192.3.3<br>संगणकशास्त्र विद्याशाखा | **विद्यापीठ अनुदान आयोग आणि विद्यापीठाच्या निर्णयामुळे नाईलाजास्तव ज्या संस्थांना अभ्यासकेंद्रे बंद करावी लागत आहेत त्यांना अनामत रक्कम परत करतांना प्रशासकीय खर्च म्हणून 15% रक्कम वजा करण्याच्या व्यवस्थापन मंडळाच्या आधीच्या निर्णयातून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव...**<br>**टिपणी** — संगणकशास्त्र विद्याशाखे अंतर्गत सुरू असलेल्या अभ्यासकेंद्रांकडून अनामत रक्कम घेण्याची पद्धत होती. अभ्यासकेंद्र बंद करण्याचे संस्थेने ठरविल्यास अनामत रक्कम परत करतांना प्रशासकीय खर्च म्हणून15% रक्कम वजा करण्याबाबतचा निर्णय व्यवस्थापन मंडळाने घेतलेला असून (व्यवस्थापन मंडळ बैठक ठराव विषय क्रमांक ए-100/ 02/ 201 (ठरावाची प्रत सोबत जोडला आहे.) त्याप्रमाणे अभ्यासकेंद्र बंद करू इच्छिणाऱ्या संस्थेने तसा अर्ज केल्यास 15% रक्कम वजा करून अनामत रक्कम परत करण्यात येते.<br>गेल्या वर्षी विद्यापीठ अनुदान आयोगाने खाजगी तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील पदवी शिक्षणक्रम चालवणारी अभ्यासकेंद्रे बंद करण्यास कळविल्याने अशा अभ्यासकेंद्रांना अभ्यासकेंद्र बंद करावी लागत आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळासाठी ट्रेनिंग प्रोव्हायडर म्हणून काम न करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतल्याने त्याअंतर्गत काम करणाऱ्या अभ्यासकेंद्रांनाही आता अभ्यासकेंद्र बंद करावी लागत आहेत.<br>वरील दोन्ही बाबतीत संस्थांची इच्छा असूनही विद्यापीठ अनुदान आयोग आणि विद्यापीठाच्या निर्णयामुळे नाईलाजास्तव त्यांना अभ्यासकेंद्रे बंद करावी लागत आहेत. ही बाब लक्षात घेऊन अशाच अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय खर्च म्हणून 15% रक्कम वजा न करता पूर्ण रक्कम परत करावी याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळापुढे विचारार्थ सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** —विद्यापीठ अनुदान आयोग आणि विद्यापीठाच्या निर्णयामुळे नाईलाजास्ताव ज्या संस्थांना अभ्यासकेंद्रे बंद करावी लागत आहेत त्यांना अनामत रक्कम परत करतांना प्रशासकीय खर्च म्हणून 15% रक्कम वजा करण्याच्या व्यवस्थापन मंडळाच्या आधीच्या निर्णयातून सूट मिळण्यास या प्रकरणापुरती खास बाब म्हणून सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 192.3.4<br>विद्यापीठ संशोधन समिती | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पीएच.डी. अध्यादेश 2023 यास व्यवस्थापन मंडळापुढे कार्योत्तर मान्यतेबाबत...**<br>**टिपणी** - विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सन 2024 पासून पीएच.डी. शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पीएच.डी. अध्यादेश 2023 हा तयार करण्यात आलेला होता त्यास दि. 19 डिसेंबर 2023 च्या विद्वत परिषदेत मान्यता देण्यात आली आहे. त्यास मा. कुलगुरूंनी दि. 24.1.2024 नुसार मान्यता दिलेली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ पीएच.डी. अध्यादेश 2023 यास तांत्रिक बाब म्हणून सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 192.3.5<br>संगणकशास्त्र विद्याशाखा | **एआयसीटीईच्या नविन सूचनेनुसार बी.सी.ए. शिक्षणक्रम 2024-25 पासून सुरू करण्याकरिता AICTEची मान्यता घेण्याबाबतचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी सादर..**<br>**टिपणी** – युजीसी च्या नविन धोरणानुसार व **AICTE** च्या सूचनेनुसार 2024-25 पासून बीसीए शिक्षणक्रम सुरू करण्याकरिता **AICTE** ची मान्यतेची आवश्यकता आहे. बीसीए शिक्षणक्रम सुरू करण्याकरिता लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरू यांनी मान्यता दिली आहे. तरी सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळापुढे सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव - AICTE**च्या नविन सूचनेनुसार बी.सी.ए. शिक्षणक्रम 2024-25 पासून सुरू करण्याकरिता **AICTE** ची मान्यता घेण्याबाबतचा प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.<br>तसेच BBA अभ्यासक्रमास अशाच प्रकारची मान्यता घेण्याची आवश्यकता असल्यास विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून पुढील प्रक्रीया करण्यास व्यवस्थापन मंडळाने तत्वत: मान्यता दिली. |
| | 192.3.6<br>विद्यार्थी सेवा विभाग | **सहयोग व विशेष उपक्रम केंद्र बंद करण्यात आल्याचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर..**<br>**टिपणी** - दि. 7 नोव्हेंबर 2023 रोजी सहयोग व विशेष उपक्रम केंद्राचा आढावा घेण्याबाबत झालेल्या बैठकीत मा. कुलगुरूंच्या मान्यतेने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले<br>१. सहयोग व विशेष उपक्रम केंद्रामधील सर्व शिक्षणक्रम इतर विद्याशाखांना हस्तांतरण करणेबाबत विद्यार्थी सेवा विभाग यांनी कार्यवाही करावी.<br>२. हस्तांतरण करण्यात आलेल्या शिक्षणक्रमांबाबतसंबंधित विद्याशाखांनी आपापल्या विद्याशाखा परिषदेत निर्णय घेऊन शिक्षणक्रम सुरू ठेवणे/पुनर्रचना करणे / बंद करणे इत्यादी बाबत निर्णय घेऊन इतिवृत्त विद्वत परिषदेसमोर मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे.<br>३. दिनांक 7 नोव्हेंबर 2023 पासून सहयोग व विशेष उपक्रम केंद्र हे पूर्णतः बंद करण्यात येत आहे. याबाबत संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांनी आगामी व्यवस्थापन मंडळ बैठकीला अवगत करावे.<br>त्यानुसार सहयोग व विशेष उपक्रम केंद्र हे पूर्णतः बंद करण्यात येत आहे हे अवगत करणेसाठी सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळ यांचेपुढे सादर..<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - सहयोग व विशेष उपक्रम केंद्र हे पूर्णतः बंद करण्यात आलेले आहे, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 192.3.7<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठाच्या गट अ संवर्गातील 3 कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या शिफारशीस मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** – विद्यापीठ कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली 12 व 24 वर्षांच्या लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासन निर्णय दि. 07.12.2018 आणि 19.02.2019 अन्वये पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली होती. तो शासन निर्णय क्र. संकीर्ण 2016/(262/16)/विशी-1 दिनांक 31 मे 2023 अन्वये पूर्ववत लागू करण्यास मान्यता आलेली आहे. त्यानुसार समितीने केलेल्या गट अ मधील तीन [१) श्रीमती भावना किरण भऊरकर २) श्री. प्रमोद रंगनाथ जावळे ३) श्री. रत्नाकर मुरलीधर भुसे] कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाच्या गट अ संवर्गातील 3 कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच शासनाच्या या संदर्भातील दि. 2 जानेवारी 2024च्या पत्राच्या अनुषंगाने उक्त नमूद दिनांक 31 मे 2023 शासननिर्णयाचा लाभ ज्या अधिकारी /कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असेल त्यांना पूर्वलक्ष्यी प्रभावाने देय करण्यात यावा. |
| | 192.3.8<br>सेवा सुविधा कक्ष | **सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठाची मुद्रा असलेले चांदीचे नाणे भेट देण्याबाबत..**<br>**टिपणी** – विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना सेवापूर्ती निमित्त विद्यापीठाची मुद्रा असलेले 100 ग्रॅम चांदीचे नाणे भेट देण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – सन 2024 व यानंतर विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना सेवापूर्ती निमित्त विद्यापीठाची मुद्रा असलेले 100 ग्रॅम चांदीचे नाणे भेट देण्यास व |

| | | |
|---|---|---|
| | | त्यासाठी येणाऱ्या खर्चास Provision of Employee Welfare यातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br><br>सदर भेट योजना माहे 1 एप्रिल 2024 पासून लागू करण्यात यावी असेही ठरले. |
| | 192.3.9<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठात नोव्हेंबर 2021 मध्ये रुजू झालेल्या 17 कर्मचाऱ्यांच्या परिविक्षा कालावधीबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे सादर...**<br><br>**टिपणी –** विद्यापीठात माहे नोव्हेंबर 2021 मध्ये नियुक्त झालेल्या 17 सहायक कर्मचाऱ्यांचा दोन वर्षाचा परिविक्षा कालावधी नोव्हेंबर 2023 मध्ये संपुष्टात येत असल्याने त्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी अध्यादेशानुसार खातेंतर्गत पदोन्नती समिती गठित करण्यात येवून समितीची बैठक दि. 21.11.2023 व 23.11.2023 रोजी पार पाडली. समितीने केलेल्या शिफारशीनुसार कार्यवाही करणेसाठीची बाब मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव –** सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ट असल्याने आणि आजपावेतो त्याचा निकाल लागला नसल्याने शासन निर्णय क्र. परिवी-2715/प्र.क्र.302/आठ - 29 फेब्रुवारी 2016 नुसार तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई तेथील दाखल याचिका क्र. 2445/2022 नुसार त्यांची सेवा आहे तशीच पुढे सुरु ठेवण्यात यावी व न्यायालयीन निर्णय झाल्यानंतर व उपरोल्लिखित शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी असे ठरले. |
| | 192.3.10<br>आस्थापना कक्ष | **School of Multidisciplinary Studies या विद्याशाखेत शिक्षकीय पदे रूपांतरित करणेबाबत...**<br><br>**टिपणी** – व्यवस्थापन मंडळ दिनांक 3 नोव्हेंबर 2023 च्या बैठकीतील ठराव क्र. 189.3.8 अनव्ये शैक्षणिक सेवा विभागाचे रूपांतर School of Multidisciplinary Studies या विद्याशाखेत करण्यात आलेले आहे. या पूर्वी शैक्षणिक सेवा विभागासाठी मंजूर 1 प्राध्यापक व 2 सहायक प्राध्यापक ही शिक्षकीय पदे School of Multidisciplinary Studies या विद्याशाखेत वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर..<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव –** व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. 189.3.8 नुसार शैक्षणिक सेवा विभागाचे रूपांतर School of Multidisciplinary Studies या विद्याशाखेत करण्यात आलेले आहे. त्या विभागातील शैक्षणिक सेवा विभागासाठी मंजूर 1 प्राध्यापक व 2 सहायक प्राध्यापक ही शिक्षकीय पदे School of Multidisciplinary Studies या विद्याशाखेत वर्ग करण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 192.3.11<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील नियमित पदोन्नती (गट-अ) सहायक कुलसचिव प्रवर्गातील 02 (दोन) कर्मचाऱ्यांना उपकुलसचिव या पदोन्नतीच्या रिक्त पदावर नियमित पदोन्नती करण्याची बाब व्यवस्थापन मंडळापुढे सादर...**<br>**टिपणी –** दि. 25.10.2023 रोजीच्या विद्यापीठातील गट – अ प्रवर्गातील पदोन्नतीबाबत मान्य प्रस्तावानुसार दि. 04.01.2024 रोजी पदोन्नती समितीची बैठक आयोजित केली होती. सदर पदोन्नती समितीच्या शिफारसी विचारात घेऊन सहायक कुलसचिव प्रवर्गातील 02 (दोन) कर्मचाऱ्यांना श्रीमती माधुरी चौरे व श्री. सुनिल विभांडिक या उपकुलसचिव या पदाच्या पदोन्नतीच्या रिक्त पदावर नियमित पदोन्नती करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 25.10.2023 रोजीच्या विद्यापीठातील गट – अ प्रवर्गातील पदोन्नतीबाबत दि. 04.01.2024 रोजी पदोन्नती समितीची बैठक आयोजित केली होती. सदर पदोन्नती समितीच्या शिफारसी विचारात घेऊन सहायक कुलसचिव प्रवर्गातील 02 (दोन) कर्मचाऱ्यांना श्रीमती माधुरी चौरे व श्री. सुनिल विभांडिक उपकुलसचिव या पदाच्या पदोन्नतीच्या रिक्त पदांवर पदोन्नती देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच विभागीय पदोन्नती समितीने विचार घेतलेला सहायक कुलसचिव पदावरून उपकुलसचिव पदावर पदोन्नतीसाठी आधारभूत मानलेल्या विवरण पत्रात नमूद अधिकाऱ्यांना पदोन्नतीसाठी पद रिक्त असल्यास त्यांच्याही पदोन्नतीबाबत कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. |
| | 192.3.12<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विद्याशाखेतील सहयोगी सल्लागार (शैक्षणिक) – नाट्यशास्त्र यांच्या नियुक्तीबाबतचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी व्यवस्थापन मंडळासमोर सादर...** |

**टिपणी** – श्री. दत्ता पाटील व श्री. सचिन शिंदे यांचा विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 दि. 1993) अन्वये मा. कुलगुरूंच्या अधिकारातील 2 वर्षे नियुक्ती कालावधी संपुष्टात आलेला आहे. सदर करारावरील अधिकारी यांची मुदतवाढी संदर्भातील शिफारस मा. संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा यांचेमार्फत प्राप्त झालेली आहे. त्यानुसार पुढील करारावरील प्रतिनियुक्तिस मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदर करारावरील पुर्ननियुक्तीबाबतची बाब मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विद्याशाखेतील नाट्यशास्त्र या शिक्षणक्रमासाठी करारावर नियुक्त असलेले "सहयोगी सल्लागार (शैक्षणिक) – नाट्यशास्त्र" श्री. दत्ता पाटील व श्री. सचिन शिंदे यांचा करार कालावधी वाढवून त्यांच्या पुढील मुदतवाढीस सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

192.3.13
आस्थापना कक्ष

**संचालक नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य या पदनामाबाबत...**

**टिपणी** – विद्यापीठाच्या विविध उपक्रमांचे यशस्वीरित्या व्यवस्थापन व अंमलबजावणी करण्यासंदर्भात संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य असे किंवा तत्सम पद निर्माण करणे आवश्यक आहे. सध्या हा कार्यभार विद्यापीठाच्या संकुलात उपलब्ध शिक्षकांना अतिरिक्त कार्यभार देऊन चालवले जाते त्यामुळे संबंधित अध्यापकाचे मूळ काम सुद्धा थोड्याफार प्रमाणात कमी होऊ शकते यामधून मार्ग काढण्यासाठी खालील बाबी मा. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येत आहेत.

1. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कायद्यातील कलम 5. (1) (xvi) to create administrative, ministerial and other necessary posts and to make appointments thereto; अशी तरतूद आहे. त्यानुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य अथवा तत्सम पदाची निर्मिती करता येऊ शकते.
2. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य या पदाचा पदावधी निश्चित करणे तो एकूण पाच वर्ष असावा असे प्रस्तावित करण्यात येत आहे अथवा मा. व्यवस्थापन मंडळ ठरविल तेवढ्या कालावधीसाठी राहील.
3. संचालक नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य या पदाचे वेतनमान निश्चित करणे.
4. या विद्यापीठाच्या कायद्यात सदर पदभरतीची तरतुद नसल्याने संचालक नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य या पदाच्या पदभरतीची कार्यपद्धती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मध्ये नमुद केल्याप्रमाणे अथवा मा. व्यवस्थापन मंडळ ठरविल त्याप्रमाणे राहील.
5. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य या पदाची कर्तव्य, जबाबदारी व सेवेच्या अटी आणि शर्ती बाबत मा. व्यवस्थापन मंडळ ठरविल त्याप्रमाणे राहील अथवा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील. सदर तरतुद यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रचलित ध्येयधोरण, आर्थिकदायित्व प्रमाणे राहील.

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – विद्यापीठात विविध विद्याशाखांतर्गत नवनवीन शिक्षणक्रमांची निर्मिती तसेच नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे. नवनवीन उपक्रम, संशोधन व आंतरसाहचर्य साधण्यासाठी पूर्ण वेळ संचालक असणे गरजेचे आहे.

मा. व्यवस्थापन मंडळाने हे पद महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मध्ये नमुद केल्याप्रमाणे कर्तव्य व जबाबदाऱ्या राहतील तसेच विद्यापीठ कायद्याप्रमाणे या पदाची पदभरती करण्यास मान्यता दिलेली आहे.

या पदाची कर्तव्य, जबाबदारी व सेवेच्या अटी आणि शर्तीबाबत मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरुंना अधिकार प्रदान केले आहेत.

192.3.14
आस्थापना कक्ष

**प्रमुख, विद्यार्थी कल्याण व बहिशा:ल केंद्र या पदाबाबत...**

**टिपणी** - विद्यार्थी कल्याण विभागाबाबत विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन, मा.

राजभवन, आंतर विद्यापीठ विभाग तसेच जिल्हा स्तरावर विद्यार्थ्यांशी निगडित योजनांचे कार्य सुरू असते. अशा कार्यांमध्ये भाग घेण्यासाठी व या उपक्रमांचे यशस्वीरित्या व्यवस्थापन व अंमलबजावणी करण्यासाठी प्रमुख, विद्यार्थी कल्याण व बहिशा:ल हे पद भरणे आवश्यक आहे. सदर प्रमुख, विद्यार्थी कल्याण हे नियमित पद शासनाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी आकृतीबंधात शासन निर्णय YMU-1303/(136/03/vishi-2 दिनांक 6/8/2004 अन्वये रु. 12,000-18,300 (प्रपाठक ग्रेड) मध्ये मंजूर केलेले असून सातव्या वेतन आयोगानुसार प्रशासकीय पदांच्या शासननिर्णयात वेतनस्तर एस-25 मधील पे-मॅट्रीक्स रु. 78800-209200 मध्ये मंजूर आहे. या मंजूर पदाचा दरमहा रु. 1,32,000/- नुसार वार्षिक रु. 15,84,000/- तर दोन वर्षासाठी 31,68,000/- इतका आर्थिक भार पडणार आहे.

सध्या हा कार्यभार विद्यापीठाच्या संकुलात उपलब्ध शिक्षकांना अतिरिक्त कार्यभार देऊन चालवले जाते. खालील बाबी मा. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येत आहेत.

1. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास शासन निर्णय दि. 6/8/2004 नुसार मंजूर प्रमुख, विद्यार्थी कल्याण हे पद भरतीसाठी मान्यता मिळावी.
2. प्रमुख, विद्यार्थी कल्याण या पदाचा पदावधी निश्चित करणे व तो एकूण दोन वर्ष असावा असे प्रस्तावित करण्यात येते.
3. प्रमुख, विद्यार्थी कल्याण या पदाचे वेतनमान निश्चित करणे.
4. प्रमुख, विद्यार्थी कल्याण हे पद आकृतीबंधात शासन निर्णयाद्वारे मंजूर असले तरी या पदाच्या पदभरतीची विहित कार्यपद्धती आढळून येत नाही. त्यामुळे या पद भरतीबाबतची कार्यपद्धती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 व महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित एकरूप परिनियम 1/2018 याप्रमाणे असावी.
5. प्रमुख, विद्यार्थी कल्याण या पदाबाबत वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती निश्चिती करणे. सेवेच्या अटी व शर्ती याबाबतचा मा. व्यवस्थापन मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे राहतील किंवा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 व एकरूप परिनियम क्र. 1/2018 यांत नमूद प्रमाणे किंवा यातील बाबी जोपर्यंत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रचलित ध्येयधोरण, आर्थिकदायित्व यामध्ये बदल करून ज्याप्रमाणे ठरविण्यात येतील किंवा यथास्थिती तसा बदल करून अटी व शर्ती असतील.

**व्यवस्थापन मंडळ ठराव – विद्यार्थी कल्याण केंद्रात** पूर्णवेळ संचालक नेमणूकीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 व एकरूप परिनियम क्र. 1/2018 यांत नमूद प्रमाणे मा. व्यवस्थापन मंडळाने पुढीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

संचालक सांस्कृतिक, क्रिडा व राष्ट्रीय सेवा योजना पदाचे निकष ठरविण्यासाठी यासाठी एक उपसमिती स्थापन करावी. यामध्ये मा. डॉ. अनिल कुलकर्णी, सदस्य-व्यवस्थापन मंडळ, अध्यक्ष, प्राध्यापक चाकणे, मा. कुलगुरू महोदयांनी नामनिर्देशित विद्यापीठाच्या विभागीय केंद्रातील प्राचार्य सदस्य आणि विद्यापीठाचे कुलसचिव सदस्य सचिव अशी चार सदस्यीय समिती गठीत करण्यात यावी असे ठरले. या समितीने समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना व बहि:शाल शिक्षण, समन्वयक क्रिडा व समन्वयक सांस्कृतिक उपक्रम आणि प्रमुख – विद्यार्थी कल्याण पदभरती व अनुषंगिक बाबींबाबत परिपूर्ण अहवाल सादर करावा.

192.3.15 आस्थापना

**संचालक, राष्ट्रीय सेवा योजना किंवा या पदनामाच्या अनुषंगाने तत्सम पद निर्माण करण्याबाबत....**

**टिपणी** - विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत महाराष्ट्र शासन, राजभवन, आंतरविद्यापीठ विभाग तसेच जिल्हा स्तरावर विद्यार्थ्यांशी निगडीत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य तहहयात सुरू असते. अशा कार्यांमध्ये भाग घेण्यासाठी व या उपक्रमांचे यशस्वीरित्या व्यवस्थापन व अंमलबजावणी करण्यासाठी संचालक, राष्ट्रीय सेवा योजना किंवा या पदनामाच्या अनुषंगाने तत्सम पद निर्माण करणे आवश्यक आहे.

सध्या हा कार्यभार विद्यापीठाच्या संकुलात उपलब्ध शिक्षकांना अतिरिक्त कार्यभार देऊन चालवले जाते त्यामुळे संबंधित अध्यापकाचे मूळ काम सुद्धा थोड्याफार प्रमाणात कमी

| | | |
|---|---|---|
| | | होऊ शकते यामधून मार्ग काढण्यासाठी खालील बाबी माननीय व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात येत आहेत.<br>1. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कायद्यातील कलम 5. (1) (xvi) to create administrative, ministerial and other necessary posts and to make appointments thereto; अशी तरतदु आहे. त्यानुसार संचालक राष्ट्रीय सेवा योजना अथवा तत्सम पदाची निर्मिती करता येऊ शकते.<br>2. संचालक राष्ट्रीय सेवा योजना या पदाचा पदावधी निश्चित करणे तो एकूण दोन वर्ष असावा असे प्रस्तावित करण्यात येते.<br>3. संचालक राष्ट्रीय योजना सेवा योजना या पदाचे वेतनमान निश्चित करणे.<br>4. या विद्यापीठाच्या कायद्यात सदर पदभरतीची तरतुद नसल्याने संचालक राष्ट्रीय सेवा योजना या पदाच्या पदभरतीची कार्यपद्धती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 व महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित एकरूप परिनियम 2/2018 याप्रमाणे असावी.<br>5. संचालक राष्ट्रीय सेवा योजना या पदाच्या वित्तलब्धी निश्चिती करणे –<br>6. सेवेच्या अटी व शर्ती याबाबत एकरूप परिनियम क्र. 2/2018 यांत नमूद बाबी जोपर्यंत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या प्रचलित ध्येयधोरण, आर्थिकदायित्व यामध्ये बदल करून ज्याप्रमाणे ठरविण्यात येतील किंवा यथास्थिती तसा बदल करून अटी व शर्ती असतील.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – संचालक, राष्ट्रीय सेवा योजना किंवा या पदनामाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**<br>संचालक राष्ट्रीय सेवा योजना या पदाचे निकष ठरविण्यासाठी यासाठी एक उपसमिती स्थापन करावी. यामध्ये मा. डॉ. अनिल कुलकर्णी, सदस्य-व्यवस्थापन मंडळ, अध्यक्ष, प्राध्यापक चाकणे, मा. कुलगुरू महोदयांनी नामनिर्देशित विद्यापीठाच्या विभागीय केंद्रातील प्राचार्य सदस्य आणि विद्यापीठाचे कुलसचिव सदस्य सचिव अशी चार सदस्यीय समिती गठीत करण्यात यावी असे ठरले. या समितीने समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना व समन्वयक बहि:शाल शिक्षण, समन्वयक क्रिडा, समन्वयक सांस्कृतिक उपक्रम आणि प्रमुख – विद्यार्थी कल्याण पदभरती व अनुषंगिक बाबींबाबत परिपूर्ण अहवाल सादर करावा. |
| | 192.3.16<br>विद्यार्थी सेवा विभाग | **विद्यार्थी सेवा विभाग येथील संचालक पदाबाबत...**<br>**टिपणी** – जून 2019 पासून प्रा. डॉ. प्रकाश देशमुख हे विद्यार्थी सेवा विभागाचे प्रभारी संचालक म्हणून काम पाहत आहे. विद्यापीठ कायदा क्र. XX of 1989 मधील. The Second Schedule of the university मुद्दा क्र. 3. The Director – 1. Every Director shall be appointed by the Board of Management on the recommendations of (1) The Vice Chancellor (if the candidate to the appointed is already a teacher of the university) ची तरतूद आहे. त्यानुसार प्रा. डॉ. प्रकाश देशमुख यांना संचालक, विद्यार्थी सेवा विभाग हे पद देण्यासंबंधीचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - प्रा. डॉ. प्रकाश देशमुख यांचे संचालक, विद्यार्थी सेवा विभाग हे पदनाम दिनांक 1 मार्च 2024 पासून निश्चित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 192.3.17<br>वित्त विभाग | **दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर समितीचे दि. 12 फेब्रुवारी 2024 चे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळासमोर सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार सदर वित्त समिती इतिवृत्त मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करून सभेत सर्वानुमते मान्यता प्रदान देण्यात आली. |
| | 192.3.18<br>वित्त विभाग | **दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी सादर केलेले सन 2024-2025 चे आर्थिक अंदाजपत्रक मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर..**<br>**टिपणी** - दि. 12 फेब्रुवारी 2024 रोजी वित्त समितीच्या बैठकीत मा. वित्त अधिकारी यांनी |

सन 2024-2025 चे वार्षिक अंदाजपत्रक सादर केले. सदर अंदाजपत्रक वित्त समितीने मान्य केले. सदर अंदाजपत्रक व्यवस्थापन मंडळास मान्यतेसाठी सादर करण्याचे ठरले, त्यानुसार सदर अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव —** विद्यापीठाचे आर्थिक वर्ष 2024-25 चा अर्थसंकल्प दि. 12 फेब्रुवारी 2024 रोजी वित्त समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करून व्यवस्थापन मंडळाच्या अंतिम मान्यतेसाठी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर खालीलप्रमाणे चर्चा झाली.

सन 2023-24 चा सुधारित अर्थसंकल्प व आर्थिकवर्ष 2024-25 चाअर्थसंकल्प विद्यापीठाचे वित्तअधिकारी, डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी सादर केला. सदर अर्थसंकल्पाचे खालीलप्रमाणे विविध योजना, सुविधा उपलब्ध होण्यासाठी तरतुदी नमुद केल्या आहेत.

विद्यार्थी हा केंद्रबिंदु मानून त्यांच्यासाठी स्टुडंट प्राईज फंड, स्टुडंट सपोर्ट स्कीमफंड, विद्यार्थी स्कॉलरशिप फंड, क्रीडा स्पर्धा तरतुद, अविष्कार, आव्हान, युवकमहोत्सव, क्रीडामहोत्सव, विद्यार्थ्यांसाठी हेल्पडेस्क, कमवा आणि शिका योजना, विद्यार्थी अपघात विमा योजना, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट योजना, तृतीयपंथी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफी योजना, स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी इत्यादी विविध विद्यार्थी योजनातून या अर्थसंकल्पात भरीव तरतुद करण्यात आली आहे.

शिक्षकांसाठी लघुसंशोधन बीजभांडवल प्रकल्प योजना, परिषदा/ सेमिनार/ वर्कशॉप्स इत्यादींसाठी ट्रॅव्हलींग खर्च योजना, पुस्तक छपाईकरिता अनुदान योजना, समंत्रकांसाठी उजळणी वर्ग योजना इत्यादी योजनातून शिक्षकांसाठी भरीव तरतुद करण्यात आलेली आहे.

विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी कर्मचारी वेलफेअर फंड, वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती योजना, कर्मचारी ट्रेनींग योजना, योगासन वर्ग चालविणे, क्रीडा स्पर्धा योजना, सानुग्रह अनुदान योजना इत्यादी योजनांतून कर्मचाऱ्यांकरिता आर्थिक तरतुदी उपलब्ध आहेत.

विद्यापीठाच्या मुंबई, पुणे, बारामती, रत्नागिरी, नागपूर इत्यादी ठिकाणी विद्यापीठाचे विभागीय केंद्र / जिल्हा केंद्राकरिता इमारती बांधकामांसाठी अनुदान विद्यापीठास शानाकडून मिळणार आहेत. तसेच अधिकारी व कर्मचारी निवासस्थानांसाठी भरीव आर्थिक तरतुद सदरअर्थसंकल्पात प्रस्तावित आहे.

कवी कुसुमाग्रजन्यास फंड, सावित्रीबाई फुलेन्यास फंड, गांधीयन विचारसरणी फंड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन फंड, वामनदादा कर्डक अध्यासन फंड, डिजास्टर मॅनेजमेंट फंड, कृषीविज्ञान केंद्र रिव्हाल्वींग फंड व कृषीविज्ञान विकास निधी इत्यादी फंडांमध्ये भरीव तरतुद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मा. कुलगुरु महोदयांच्या संकल्पनेतून "डिजीटल भारत" या योजनेस पुरक असे विद्यापीठाचे डीबीटी पोर्टल सुरु करण्यासाठी या अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद करण्यात आली आहे.

कृषी विज्ञान केंद्रासाठी प्रयोगशाळा, वर्कशॉप्स इमारतीसाठी तरतुदी, मधुमक्षिकापालन केंद्र, मधुमक्षिका गाव उभारणी प्रकल्प, श्वानसंशोधन केंद्र इत्यादीसाठी अर्थसंकल्पात भरीव तरतुद करण्यात आली आहे.

भारतीय ज्ञान प्रणाली संग्रहालय, आदिवासी परंपरा व सांस्कृतीक केंद्र उभारणीसाठी भरीव तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे सदर अर्थसंकल्प रु. 781 कोटीचा अर्थसंकल्प मान्य करण्यात आला. सदर अर्थसंकल्प तयार करणारे समिती अध्यक्ष डॉ. अनिल कुलकर्णी, सर्वसमिती सदस्य, वित्त अधिकारी व वित्त विभागातील सर्व संबंधीत कर्मचारी यांचे बैठकीत अभिनंदन करण्यात आले. सदर अर्थसंकल्प विद्यापीठाच्या विकासात आर्थिक दिशा दर्शक ठरेल असे मा. कुलगुरु महोदय यांनी कौतुक केले.

192.3.19
वित्त विभाग

**दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी सादर केलेला सन 2022 व 2023 चा अंकेक्षण अहवाल व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**

**टिपणी —** दि. 12 फेब्रुवारी 2024 रोजी वित्त समितीच्या बैठकीत सन 2022 व 2023 चा अंकेक्षण अहवाल सादर करण्यात आला होता. सदर अंकेक्षण अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे ठरले, त्यानुसार सदर अंकेक्षण अहवाल मान्यतेस्तव सादर....

**व्यवस्थापन मंडळ ठराव —** विद्यापीठाच्या वित्त समिती बैठक दि. 12 फेब्रुवारी 2024 रोजी आर्थिक वर्ष 2022-23 चा अंकेक्षण अहवालास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

अंकेक्षण अहवालाप्रमाणे सन 2009-10 ते 2022-23 या वर्षातील लेख्यामध्ये बँक खात्याच्या

| | | |
|---|---|---|
| | | ताळमेळानुसार अंतिम नोंदी घेण्यात आल्या असून, त्याबाबत सविस्तर चर्चा होऊन मान्यता प्रदान करण्यात आली तसेच विविध प्रलंबीत अंकेक्षणातील परिच्छेदांचे निरसन करून त्यानुसार लेख्यामध्ये नोंदी घेण्याचे महत्वपुर्ण काम वित्तविभागाने पुर्ण केले असून, या कामासाठी विविध पाच सनदी लेखापालांच्या फर्मने केलेल्या कामाचा सविस्तर आढावा घेऊन त्याप्रमाणे केलेल्या नोंदीस मान्यता प्रदान करण्यात आली. या कामी विद्यापीठाचे वित्त अधिकारी व विभागातील कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात आले. |
| | 192.3.20 आस्थापना कक्ष | **केंद्र स्तरावरील 'स्वयंम' च्या धर्तीवर राज्यस्तरावरील अभ्यासक्रमांसाठी राज्यस्तरावर 'महास्वयंम' सुरू करणेबाबतचा प्रस्ताव...**<br>**टिपणी** - केंद्रस्तरावर 'स्वयंम' हे पोर्टल पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना विविध विषय/कौशल्य/ज्ञान देण्यासाठी उपलब्ध आहे. त्याच पद्धतीने राज्यातील विद्यार्थ्यांना विविध भाषांमधून सदर ज्ञान उपलब्ध होण्यासाठी 'महास्वयंम' हे पोर्टल उपलब्ध करून देणे नविन शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी परिणामकारक होण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.<br>त्यासाठी राज्यशासन आणि विविध विद्यापीठांनी एकत्र येऊन अंमलबजावणी करणे योग्य होईल. सदर बाब विचारात घेता खालील प्रस्ताव विचारार्थ आणि मान्यतेसाठी सादर-<br>१. 'महास्वयंम' पोर्टल सुरू करण्यासाठी राज्यशासन आणि विविध विद्यापीठांनी एकत्र येऊन consortium/संघ स्थापन करावा.<br>२. या संघामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक यांनी पुढाकार घेऊन संघ स्थापनेस सुरवात करावी व समाविष्ठ विद्यापीठांमध्ये सामंजस्य करार करण्यात यावा.<br>३. संघामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासोबत मुंबई विद्यापीठ, मुंबई, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई यांचा सुरवातीस समावेश असावा.<br>४. 'महास्वयंम' हा उपक्रम यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशभारती इमारतीमध्ये कार्यान्वित करता येऊ शकेल.<br>५. 'महास्वयंम' च्या कार्यपध्दती, शैक्षणिक साधन निर्मिती व संबंधित बाबींसाठी श्री. समीर सहस्त्रबुद्धे यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात यावी.<br>६. 'महास्वयंम' साठी लागणारी साधन सामग्री, तंत्रज्ञान व प्रशासकीय मनुष्यबळ याबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना प्रदान करण्यात यावेत जेणेकरून 'महास्वयंम' उपक्रम यशस्वीरित्या राबविता येऊ शकेल.<br>ज्यामध्ये मनुष्यबळासाठी पद निर्मिती, पदसंख्या, आवश्यक पात्रता द्यावयाचे वेतन आणि सेवाशर्ती व इतर अनुषंगीक बाबींचा समावेश असेल. याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर विचारार्थ व निर्णयार्थ सादर..<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – केंद्र स्तरावरील 'स्वयंम' च्या धर्तीवर राज्यस्तरावरील अभ्यासक्रमांसाठी राज्यस्तरावर 'महास्वयंम' पोर्टल सुरू करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने तत्वत: मान्यता दिली.<br>यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही सुचविण्यात आली : -<br>हे केंद्र सुरु करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची आर्थिक तरतूद (अर्थशीर्षात) करण्यात यावी.<br>महास्वयंम उपक्रम विद्यापीठाच्या यशभारती इमारतीमध्ये सुरु करण्यात यावा.<br>मनुष्यबळासाठी पद निर्मिती, पदसंख्या, आवश्यक पात्रता, द्यावयाचे वेतन आणि सेवाशर्ती व इतर अनुषंगीक बाबींसाठीचे सर्व अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आले आहेत. |
| | 192.3.21 आस्थापना कक्ष | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ परिसरात आदिवासी जीवन शैली आणि संस्कृती केंद्राच्या इमारत बांधकामाबाबत....**<br>**टिपणी** - : मा. राज्यमंत्री, संसदीय कार्य मंत्रालय, भारत सरकार, श्री. व्ही. मुरलीधरन यांनी त्यांच्या MPLADS निधीतून विद्यापीठ परिसरात आदिवासी जीवन शैली आणि संस्कृती केंद्र |

| | | |
|---|---|---|
| | | इमारत बांधकामासाठी 2.50 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. या केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठाला नाशिक जिल्ह्याच्या लगतच्या आदिवासी क्षेत्रात आदिवासी जीवन शैली आणि संस्कृतीचे संवर्धन, जतन, विकसन, इ. संदर्भात मोठ्या प्रमाणात कार्य करता येईल. या केंद्राच्या इमारतीसाठी विद्यापीठ परिसरात जागा उपलब्ध करून देता येईल. यासाठी मा. खासदार, श्री. व्ही. मुरलीधरन यांचे खासदार निधीतून 2.50 कोटी रुपये मिळणार असले तरी इमारत बांधकाम व भविष्यात येणारा देखभाल व दुरुस्तीचा खर्च विचारात घेता अधिकचा निधी लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठ निधीतूनही यासाठी आवश्यक तरतूद करणे क्रमप्राप्त ठरणार आहे.<br>उपरोक्त बाब विचारात घेता, विद्यापीठ परिसरात आदिवासी जीवन शैली आणि संस्कृती केंद्राची स्थापना करणे व आवश्यकतेनुसार अधिकचा निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ व निर्णयार्थ सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठ परिसरात आदिवासी जीवन शैली आणि संस्कृती केंद्राची स्थापना करणे व आवश्यकतेनुसार अधिकचा निधी विद्यापीठ निधीतून उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मान्यता दिली व विद्यापीठाचा लागणारा अधिकचा आर्थिक हिस्सा यास वित्त समितीने मान्यता दिलेली आहे व आगामी अर्थसंकल्पात याबाबतची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. हे सभागृहास अवगत करण्यात आले. |
| 192.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – वरील विषयांव्यतिरिक्त असलेल्या ऐनवेळचे विषय मांडण्यासाठी मा. कुलगुरूंनी मान्यता दिली. |
| 192.4 | 192.4.1<br>आस्थापना कक्ष | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील दोन कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करणेबाबत....**<br>**टिपणी - :** मे २००५ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार डॉ. सुरेंद्र पाटोळे व डॉ. प्रकाश बर्वे या शिक्षकांनी विद्यापीठात अर्ज केले होते. विहित निवड प्रक्रियेद्वारे त्यांची निवड करण्यात येऊन ते ऑगस्ट २००६ मध्ये विद्यापीठात ३५० मधील पदावर रुजू झालेले आहेत.<br>तरी सदर योजना या विद्यापीठातील डॉ. सुरेंद्र पाटोळे, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा तसेच डॉ. प्रकाश बर्वे, उपग्रंथपाल, ग्रंथालय व माहितस्रोत केंद्र यांना लागू करता येऊ शकते. सदर प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ व निर्णयार्थ सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – डॉ. सुरेंद्र पाटोळे व डॉ. प्रकाश बर्वे या दोन कर्मचाऱ्यांना व उक्त शासन निर्णयात नमूद अटी व शर्तीनुसार ज्यांची नियुक्ती झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा 1989 मध्ये नमूद संवैधानीक पदांवर शासन मान्य वेतन अनुदानित व सेवानिवृत्ती वेतनार्ह पदांवर कार्यरत असणारे अधिकारी संवैधानिक पदांवर रुजू झाल्यास अशा अधिकाऱ्यांना पण शासनाची सेवानिवृत्ती वेतन योजना लागू राहील. |
| 192.4 | 192.4.2<br>आस्थापना कक्ष | **मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे दोन विद्याशाखांत विभाजन करून आरोग्य विज्ञान विद्याशाखेतील प्राध्यापक पद सदर विद्याशाखेत वर्ग करणेबाबत.......**<br>**टिपणी - :** मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अस्तित्वात असून यातील Language साठी वेगळा विभाग असावा याकरिता School of Language, Literature & Cultural Studies अशा नवीन विद्याशाखेची निर्मिती करावयाची आहे.<br>मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. 19 जानेवारी 2004 च्या बैठकीत विद्याशाखानिहाय पदांची विभागणी करताना विद्यापीठातील मंजूर शिक्षकीय पदांपैकी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत 01 प्राध्यापक, 02 सहयोगी प्राध्यापक आणि 04 सहायक प्राध्यापक अशी पदे देण्यात आली आहेत.<br>School of Language, Literature & Cultural Studies विद्याशाखा निर्माण करताना तेथे |

| | | |
|---|---|---|
| | | शिक्षकीय पदांची आवश्यकता असल्याने मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील प्राध्यापकाव्यतिरिक्त 01 सहयोगी प्राध्यापक आणि 02 सहायक प्राध्यापक या विद्याशाखेतून School of Language Literature & Cultural Studies या नवीन विद्याशाखेत वर्ग करण्यात यावे.<br>तसेच सन 2004 पासून आरोग्य विज्ञान विद्याशाखेत 01 प्राध्यापकाचे पद मंजूर असून अद्यापपावेतो सदर पद भरले नसल्याने आरोग्य विद्याशाखेत प्राध्यापकाची आवश्यकता नाही.<br>त्यामुळे आरोग्य विद्याशाखेतील 01 प्राध्यापकाचे शासन मान्य मंजूर पद हे School of Language Literature & Cultural Studies या विद्याशाखेत वर्ग करण्यात यावे या संदर्भात मा. कुलगुरू, व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. जयदीप निकम, डॉ. अनिल कुलकर्णी यांचे समवेत चर्चा झालेली असून त्याअनुषंगाने याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीसमोर विचारार्थ व निर्णयार्थ सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे दोन विद्याशाखांत विभाजन करून या विभागाचे नामाभिधान School of Language, Literature & Cultural Studies असे करण्यात यावे व आरोग्य विज्ञान विद्याशाखेतील प्राध्यापक पद सदर विद्याशाखेत वर्ग करणेबाबत मा. व्यवस्थापन मंडळाने पुढीलप्रमाणे मान्यता दिली.<br>याबाबत मा. व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी आणि डॉ. जयदीप निकम यांची उपसमिती गठीत करून सदर समितीने आकृतीबंध, शैक्षणिक कार्यभार व अनुषंगिक बाबी विचारात घेऊन अहवाल सादर करावा. अहवालातील शिफारशींनुसार या पदांबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा. व्यवस्थान मंडळाच्या वतीने मा. कुलगुरुंना देण्यात आला. |
| 192.4 | 192.4.3<br>शैक्षणिक संयोजक दिव्यांग अध्ययन केंद्र | **बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमासाठी भारतीय पुनर्वास परिषद नवी दिल्ली यांचेसोबत सन 2027 पर्यंत सामंजस्य करार केला आहे. यासाठी विशेष शिक्षण क्षेत्रातील दोन तज्ज्ञांची नेमणूक केली. सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मंजुरीसाठी सादर....**<br>**टिपणी** - भारतीय पुर्नवास परिषद(RCI), नवी दिल्ली यांच्या मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रम श्रवणबाधित, दृष्टीबाधित आणि मतिमंदत्व या तीन प्रवर्गात कार्यान्वित केला जात आहे. आपल्या विद्यापीठाने हा शिक्षणक्रम कार्यान्वित करण्यासाठी दिल्ली येथील भारतीय पुनर्वास परिषदेसोबत (RCI) सन २०२२-२०२७ पर्येत सामंजस्य करार केलेला आहे.<br>सामंजस्य करारनुसार बी.एड.विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी एक तज्ज्ञ सल्लागार समिती गठीत केली जाते. ह्या समितीत भारतीय पुनर्वास परिषदेचे दोन तज्ञ आणि विद्यापीठामार्फत दोन तज्ज्ञांची नेमणूक केली जाते.<br>सन २०२२मध्ये आर.सी.आय. सोबतच्या झालेल्या नवीन कराराप्रमाणे धारिका: CDS/विशेष शिक्षण/२०२३ दि. १२/०१/२०२४ नुसार विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंनी व्यवस्थापन मंडळ अध्यक्षांच्या वतीने विशेष शिक्षण क्षेत्रातील दोन तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्य म्हणून सन २०२२ ते २०२७पर्यंत केली आहे. सदर तज्ज्ञांची नावे व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर ....<br>तज्ज्ञ व्यक्तींची नावे :<br>१. डॉ. वर्षा श्रीकांत गड्डू , सेवा निवृत्त विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र, AYJNISHD (D) बांद्रा मुंबई ४०००५०<br>२. डॉ. सुरेखा पाटील, संचालक, सुहित जीवन ट्रस्ट पेण-४०२१०७ सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीसमोर कार्योत्तर मंजुरीसाठी सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — भारतीय पुनर्वास परिषदेसोबत (RCI) च्या तज्ज्ञ सल्लागार समिती वर डॉ. वर्षा श्रीकांत गड्डू व डॉ. सुरेखा पाटील या दोन तज्ज्ञ व्यक्तींची सन 2022-2027 करीता नामनिर्देशनास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 192.4 | 192.4.4<br>स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग | **प्रो. समीर सहस्त्रबुद्धे यांचे महास्वयम साठी प्राप्त झालेले Consultancy proposal मान्यतेबाबत ...**<br>**टिप्पणी** — महाराष्ट्र शासन संदर्भ क्र. बैठक-२०२४/प्र/क्र.०७/विशि-३ दि. १९ जानेवारी २०२४ चे पत्र मिळाले. त्या पत्रासोबत ३ जानेवारी २०२४ रोजी मा. प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांच्या दालनात दूर शिक्षण प्रणालीद्वारे महास्वयम प्लॅटफॉर्म व पोर्टल बाबतच्या बैठकीचे इतिवृत्त मिळाले. त्या इतिवृत्तात मुद्दा क्र. ४ मध्ये "महास्वयम प्लॅटफॉर्मच्या विकासासाठी व अंमलबजावणीसाठी डॉ. |

| | | |
|---|---|---|
| | | समीर सहस्रबुद्धे, IIT गांधीनगर यांचे सहकार्य घ्यावे" असे म्हंटलेले आहे.(परिशिष्ट-१)<br>त्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील स्वयम प्लॅटफॉर्म व पोर्टलच्या विकासाठी डॉ. समीर सहस्रबुद्धे यांची तज्ज्ञ सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी त्यांच्या नियुक्तीनंतर Consultancy proposal for Mahaswayam विद्यापीठाला सादर केले आहे. त्यात त्यांनी कार्याचा road map विचारात घेऊन तयार केलेली उद्दिष्ट, Consultancy approach, advisory support in development of Mahaswayam aspect, concept creation, support expected from Mahaswayam project YCMOU (Human & Logistic), Timeline of the project, financial aspect आणि brief outline of the course इ. मुद्यांचा समावेश केला आहे. (परिशिष्ट-२) सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - प्रो. समीर सहस्रबुद्धे यांचे महास्वयमसाठी प्राप्त झालेल्या Consultancy proposal विचार करताना विद्यापीठासाठी त्यांचे योगदान कशाप्रकारे मिळणार, hour basis किंवा monthly basis यावर प्रो. समीर सहस्रबुद्धे यांनी व मा. कुलगुरू यांनी प्रत्यक्ष चर्चा करून निर्णय घ्यावा असे ठरले. |
| 192.4 | 192.4.5 Center for Innovation, Incubation & Limkages | **"YASH Research and Entrepreneurial Hub Foundation"** या कंपनी कायद्या अंतर्गत सेक्शन 08 कंपनी स्थापित करण्याबाबतचा प्रस्ताव ...<br>**टिपणी** – मा.व्यवस्थापन मंडळाच्या ठराव क्रमांक. 188.3.15, दिनांक २० जून २०२३ नुसार व मा. कुलगुरू यांच्या मान्येतेने Yash Center for Innovation , Incubation and Linkages या केंद्राची स्थापना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापेठ येथे करण्यात आलेली आहे. याचा उद्येश नवोपक्रम, नवसंशोधन, स्टार्टअप निर्मिती व उद्योजकतेस प्रोस्ताहन देणे व मुल्यसाखळी निर्माण करणे आहे.<br>वरील विषयाला अनुसरून या केंद्राचे कामकाज पुढे नेण्यासाठी व या संदर्भात शासन स्तरावरील विविध विभागातील निधी प्राप्त होण्यासाठी कंपनी कायद्यांतर्गत सेक्शन ०८ कंपनी विद्यापीठ स्तरावर स्थापित करणे बंधनकारक आहे. सदरील कंपनी YASH Research and Entrepreneurial Hub Foundation या नावाने प्रस्तावित करण्यात येत आहे.<br>Ministry of Corporate Affairs Government of India च्या धोरणान्वये व नियमान्वये नोंदणीसाठी कंपनी सेक्रेटरीकडे पाठविण्यात येईल. सदरील कंपनी नोंदणी साठी व त्याचे बँकेत नवीन बँक खाते उघडून, Paid up Capital भरण्यास अंदाजित एकूण रु १,५५,०००/- (अक्षरी – रु एक लक्ष पंचावन हजार) इतका अपेक्षित खर्च प्रस्तावित आहे.<br>करीता, YASH Research and Entrepreneurial Hub Foundation कंपनी कायद्यांतर्गत सेक्शन ०८ कंपनी स्थापन करण्याच्या प्रक्रियेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – सदर प्रस्तावाची व्यवहार्यता व गरज अभ्यासण्यासाठी उपसमिती स्थापन करावी. उपसमिती गठणाचे सर्वाधिकार मा. कुलगुरूंना देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. |
| 192.4 | 192.4.6 | **विद्यापीठाच्या शिक्षकांना कॅसचे लाभ देणेबाबत...**<br>**टिपणी** – UGC आणि AICTE च्या निकषानुसार विद्यापीठातील सहा शिक्षकांना कॅस अंतर्गत लाभ देण्याकरिता तीन विषय तज्ञांचे नामनिर्देशन व्यवस्थापन मंडळाने करावयाचे असल्याने नामनिर्देशनार्थ सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - UGC आणि AICTE च्या निकषानुसार विद्यापीठातील सहा शिक्षकांना कॅस अंतर्गत लाभ देण्याकरिता तीन विषय तज्ञांचे नामनिर्देशन करण्याचे सर्व अधिकार मा. कुलगरू यांना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 192.4.7 | **वित्त समिती सभा बैठक क्र. 10 दि. 27.2.2024 इतिवृत्त मान्यतेबाबत...**<br>**टिपणी** – वित्त समिती सभा बैठक क्र. 10 दि.27.2.2024 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – वित्त समिती सभा क्र. 10 दि. 27.2.2024 च्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा करून सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 192.4.8 | **भारतीय आयकर विभाग यांचेकडून प्राप्त आयकर कपातीच्या नोटीसबाबत**<br>**टिपणी** – भारतीय आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या आयकर कपातीबाबतच्या खर्चाविषयी निर्णय घेणेसाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर... |

| | | |
|---|---|---|
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** — ठराव करण्यात येतो की, विद्यापीठाच्या दि. 31.03.2022 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात मिळालेल्या निव्वळ जमा रक्कम रु. 9,50,00,000/- (रुपये नऊ कोटी पन्नास लक्ष फक्त) इतकी रक्कम पुढील पाच वर्षात विद्यापीठाच्या इमारती, फर्निचर, मशीनरी इत्यादी बाबींवर होणाऱ्या खर्चासाठी राखुन ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. असेही ठरविण्यात आले की, वरील रक्कम विद्यापीठ अधिनियमातील तरतुदीप्रमाणे बँकेत ठेव म्हणून ठेवावी. तसेच आयकर प्राधिकाऱ्यांना याबाबत कळविण्यात यावे. |
| | 192.4.9 | **विद्यापीठाच्या लेखा संहितेबाबतची माहिती मा. संचालक कार्यालयास सादर करणेबाबत...**<br>**टिपणी** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास इतर अकृषी विद्यापीठासाठी लागु असलेली समान लेखा संहिता लागु असल्याची माहिती सादर करणेबाबत मा. संचालक कार्यालय पुणे यांच्या पत्र क्र. उशिसं/(81/19)/2023-24/लेखा-5606 दि. 09.05.2023 नुसार माहिती मागितलेली आहे. परंतु प्रस्तुत विद्यापीठास केवळ 2015-16 या आर्थिक वर्षासाठी लेखा संहिता प्रायोगिक तत्वावर लागु करण्याबाबतचा व्यवस्थापन मंडळाचा ठराव नस्तीवर उपलब्ध आहे. त्यानंतरच्या कालावधीसाठी विद्यापीठास लेखा संहिता लागु असल्याची माहिती उपलब्ध होत नाही. त्यामुळे सर्व अकृषी विद्यापीठांसाठी लागु असलेली लेखा संहिता या विद्यापीठास लागु करणेबाबत मा. संचालक, उच्च शिक्षण पुणे यांना विनंती करणेबाबतचा व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयास्तव सविनय सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — इतर अकृषी विद्यापीठांसाठी लागु असलेल्या समान लेखा संहिताच्या यादीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे नाव समाविष्ट करणेबाबत मा. संचालक, उच्च शिक्षण पुणे यांना विनंती करणेबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 192.4.10 | **उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून वित्तीय बाबींच्या चौकशीच्या अनुषंगाने शासनास स्वयं स्पष्ट स्पष्टीकरण सादर करणेबाबत.**<br>**टिपणी** - उच्च शिक्षण संचालनालय आणि मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार विद्यापीठाचे प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन तथा विविध बँकांच्या खात्याचे ताळमेळ घालण्याच्या अनुषंगाने दि. 27 मार्च 2023 रोजी झालेल्या वित्त समितीच्या बैठकीतील निर्णयानुनसार नेमण्यात आलेल्या विविध पाच सनदी लेखापालांनी सन 2009-10 ते 2022-23 या कालावधीचा सादर केलेला अहवालावर सविस्तर चर्चा होऊन शासनास सादर करण्याच्या मान्यतेस्तव सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — उच्च शिक्षण संचालनालय *आणि* मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार विद्यापीठाचे प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन तथा विविध बँकांच्या खात्याचे ताळमेळ घेण्यासाठी विद्यापीठाने पाच सनदीलेखापालांची नियुक्ती केली होती. त्यांनी सन 2009-10 ते 2022-23 या कालावधीचा विविध आक्षेपित त्रुटीच्या अनुषंगाने सादर केलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा होऊन अहवालात सुचविलेल्या दुरुस्त्या करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली व शासनास त्रुटीच्या दुरुस्त्यांसह अहवाल सादर करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 192.4.11 | **कंपन्यांचे निबंधक व इतर शासकीय कार्यालयांना आणि नियमन करणाऱ्या प्राधिकाऱ्यांना सादर करावयाच्या फॉर्म वर सही करण्यासाठी अधिकाऱ्यांचे नामनिर्देशनाबाबत...**<br><br>**टिपणी** : मा, कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन मंडळास नमुद केले की, कंपन्यांचे निबंधक यांचे निर्देशानुसार कंपनी अधिनियम 2013 मधील सेक्शन 135 व कंपनी (CSR Policy) नियम 2014 च्या नियम क्र. 4 (1) व (2) च्या तरतुदीनुसार वैधानिक संस्थांच्या अधिनियमात कर्पोरेट सोशल रिसपॉन्सीबीलिटी अंतर्गत उपक्रम राबविण्यासाठी सुधारणा करणे आवश्यक आहे. उपरोक्त तरतुदीनुसार संवैधानिक संस्थांनी सी.एस.आर.चे उपक्रम राबविण्यासाठी संबंधित प्राधिकाऱ्यांकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. मा. कुलगुरु महोदयांनी असेही नमुद केले की, कंपन्यांचे निबंधक यांचेकडे विद्यापीठाच्या सोईसाठी सी.एस.आर. उपक्रम राबविण्याबाबत नोंदणी करण्यासाठी भौतिक किंवा डिजिटल स्वरुपातील विविध संवैधानिक फॉर्म वर अधिकृत अधिकारी म्हणून स्वाक्षरी करण्यासाठी विद्यापीठाचे अधिकारी नामनिर्देशित |

| | | |
|---|---|---|
| | | करणे आवश्यक आहे. यासाठी व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता असल्यामुळे मान्यतेसाठी सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – कंपन्यांचे निबंधक यांचेकडे विद्यापीठाच्या सोईसाठी सी.एस.आर. उपक्रम राबविण्याबाबत नोंदणी करण्यासाठी भौतिक किंवा डिजिटल स्वरुपातील विविध संवैधानिक फॉर्म वर अधिकृत अधिकारी म्हणून स्वाक्षरी करण्यासाठी विद्यापीठाचे वित्त अधिकारी व कुलसचिव यांना नामनिर्देशित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ यांच्या परवानगीने कुलसचिव यांनी बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**सचिव तथा कुलसचिव**
**जव्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष तथा मा. कुलगुरू**
**व्यवस्थापन मंडळ**